# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पालघर

क्र.महसूल/आस्था/टे-२/महसूल सहायक/अं.ज्ये.या./एसआर-९० /२०२१ दिनांक ०६ /०४/२०२१

विषय :- दिनांक ०१/०१/२०२१ रोजी कार्यरत असलेल्या महसूल सहायक संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

**ज्ञापन :-**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, दिनांक २१/१०/२०११ मधील तरतुदीनूसार पालघर जिल्हा आस्थापनेवरील स्थानापन्न महसूल सहायक संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१/०१/२०२१ रोजीची ज्येष्ठता दर्शविणारी अंतरिम (प्रारुप) ज्येष्ठता यादी महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठता विनियमन) नियम १९८२ मधील तरतुदींनुसार या कार्यालयाकडील ज्ञापन क्र.महसूल/आस्था/टे-२/लिपीक/प्रा.ता.ज्ये.या/एसआर-१३/२०२१, दिनांक १५/०२/२०२१ अन्वये प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर यादी प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत त्यावर हरकती / सुचना दाखल करता येतील. सदर हरकती /सूचना कार्यालय प्रमूखांच्या अभिप्रायासह सादर करण्यात याव्यात, असे नमूद करण्यात आलेले होते.

सदर अंतरिम ज्येष्ठता यादीबाबत सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखा तसेच या कार्यालयाचे स्तरावर प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप यावर केलेली कार्यवाही व निर्णय सोबतच्या प्रपत्र - "अ" मध्ये दर्शविले आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठता विनियमन) नियम १९८२ मधील तरतुदींनुसार दिनांक ०१/०१/२०२१ रोजीची महसूल सहायक संवर्गाची अंतिम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सर्व कार्यालय / शाखा प्रमूख यांनी सदरची अंतिम ज्येष्ठता यादी त्यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन, त्यांचे अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या सर्व संबंधित महसूल सहायक कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी. सदरची ज्येष्ठता यादी प्रसिध्द केलेबाबतचा अहवाल या कार्यालयात दि.२२/०४/२०२१ पर्यंत सादर करावा.

स्वाक्षरी/-
**(डॉ माणिक गुरसळ)**
**जिल्हाधिकारी पालघर**

**प्रत :- माहितीसाठी सविनय सादर**
मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**
१. अपर जिल्हाधिकारी पालघर, मुख्यालय जव्हार यांना माहितीसाठी
२. सहाय्यक जिल्हाधिकारी जव्हार/डहाणू
३. जिल्हा पुरवठा अधिकारी, पालघर

पार्श्वनाथ ९, बिडको नाका, जिल्हा पालघर. पिन कोड - ४०१ ४०४
संपर्क क्र. ०२५२५ - २५३१११ ▪ ई-मेल : collector.palghar-mh@gov.in ▪ वेबसाईट : palghar.gov.in

४. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सुर्या प्रकल्प डहाणू
५ .उपजिल्हाधिकारी निवडणूक/रो.ह.यो./पुनर्वसन/भूसंपादन जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर
६. उपविभागीय अधिकारी, पालघर/वसई/वाडा
७. तहसिलदार पालघर/डहाणू/तलासरी/वसई/वाडा/विक्रमगड/जव्हार/मोखाडा
८. जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, पालघर

२/- सदर अंतरिम ज्येष्ठता यादी या कार्यालयाचे (www.collectorpalghar.nic.in) या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी. सदर यादी संकेत स्थळावर १५ दिवस ठेवण्यांत यावी.

(डॉ.किरण महाजन)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय पालघर

**(स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**

दि.०१/०१/२०२१ रोजीच्या अंतरिम प्रारुप ज्येष्ठता यादीस प्राप्त झालेले आक्षेप व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचे विवरणपत्र

प्रपत्र - अ

| तात्पुरत्या ज्येष्ठता यादीतील क्रमांक | कर्मचाऱ्याचे नांव | आक्षेप/हरकत | आक्षेप/हरकत मान्य व अमान्य बाबत निर्णय |
|---|---|---|---|
| ३९ | श्रीम.बोरसे किरण हेमंत महसूल सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर | ज्येष्ठता यादी क्र.३९ वर श्रीम.बोरसे यांची शैक्षणिक अर्हता एच.एस.सी. दर्शविली असून त्यांची शैक्षणिक अर्हता बी.ए आहे ती दुरुस्त करणेची विनंती करणेत आली आहे. | आक्षेप अर्जासोबत सादर केलेल्या पदवी प्रमाणपत्रावरुन आक्षेप मान्य करण्यात येत आहे. ज्येष्ठता यादीत श्रीम.बोरसे यांची शैक्षणिक अर्हता एच.एस.सी. या ऐवजी बी.ए. अशी नोंद घेण्यात आली. |

(डॉ.किरण महाजन)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय पालघर

(स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)